| पी.डब्ल्यू.डी.व्ही. अर्ज क्र. ५८/२०२५ मधील निशाणी क्र.१४<br>खालील आदेश<br>(माधवी राहूल साळवी विरुध्द राहूल सुभाषराव साळवी व इतर) | MHAH150018472025 |
|---|---|

सदरचा अर्ज सामनेवाले क्र. २ ते ४ यांनी त्यांच्याविरूध्द अर्जात झालेला "विनाम्हणणे" चा आदेश रद्द होवून म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत सामनेवाले याने शपथपत्र जोडलेले आहे.

२. सामनेवाले यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, सामनेवाली क्र. २ ही वयस्कर आहे. ती आजारी असल्याने पुणे येथे दवाखान्यात गेली होती. सामनेवाले क्र. ३ व ४ यांना तिच्यासोबत जावे लागल्यामुळे त्यांना न्यायालयात हजर राहून म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे सामनेवाले क्र. २ ते ४ विरूध्द विनाम्हणणे आदेश पारीत करण्यात आला होता. सदर झालेला उशिर हा नैसर्गिक कारणामुळे झाला आहे. सबब, सामनेवाले यांच्याविरूध्द झालेला "विनाम्हणणे" आदेश रद्द होवून त्याचे म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळावी.

३. अर्जदाराने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, सामनेवाले हे दिनांक २३.०९.२०२५ रोजी प्रस्तुत अर्जामध्ये हजर झाले आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत अर्जाची कल्पना आहे. सामनेवाले यांना जवळपास पाच महिन्यांचा उशिर झालेला आहे. सामनेवाले यांनी अर्जदारास त्रास देण्यासाठी जाणिवपुर्वक उशिर केलेला आहे. सामनेवाले यांनी झालेल्या उशिराबाबत पुरेसे कारण दिलेले नाही. सबब, जास्तीत जास्त दंड आकारूण अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. सामनेवाला हे दिनांक २३.०९.२०२५ रोजी अर्जात हजर झाले व त्यानंतर पुरेशी संधी देवून देखील त्यांनी मुदतीत म्हणणे दाखल केले नाही. त्यास सामनेवाले यांनी सामनेवाली क्र. २ ही वयस्कर आहे. ती आजारी असल्याने पुणे येथे

दवाखान्यात गेली होती. सामनेवाले क्र. ३ व ४ यांना तिच्यासोबत जावे लागल्यामुळे त्यांना न्यायालयात हजर राहून म्हणणे दाखल करता आले नाही असे कारण नमुद केले आहे. परंतु, सदर कारणाच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. प्रस्तुत अर्जात म्हणणे दाखल करण्यास झालेल्या उशिराबाबत सामनेवाला यांनी दिलेले कारण संयुक्तीक नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ अन्वये पोटगी व इतर मागण्यांसाठी दाखल केला आहे. त्यामुळे अर्ज पुर्णतः गुणदोषावर निकाली काढणेकरीता दोन्ही बाजुंचे म्हणणे व पुरावा अभिलेखावर असणे आवश्यक आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार सामनेवाले यांना त्यांचे म्हणणे दाखल करण्यास परवानगी देणे योग्य ठरेल. म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सामनेवाले क्र. २ ते ४ यांच्याविरुध्द अर्जात झालेला "विनाम्हणणे" आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. सामनेवाले क्र. २ ते ४ यांनी अर्जदाराला दंडापोटी रक्कम रुपये १०००/- (रक्कम रुपये एक हजार फक्त) द्यावेत. तद्नंतर सामनेवाले यांचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2026.04.28 17:19:40 +0530

**(संध्या यु. सुळ)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण- नेवासा
दिनांक – २८/०४/२०२६